साप्ताहिक
आर्य व्रत
आवाज सर्वसामान्य जनतेचा !

◎ जालना ■ वर्ष २ रे ■ अंक १० वा ■ सोमवार, २८ सप्टेंबर २०२६ ◎ किमंत ३ रुपये ◎ पाने ४

संपादक : अनिल शिवाजी खरगे सहसंपादक : भारती प्रभाकर भोज (खरगे) RNI : MHMAR/25/A0711

मोटारसायकल चोरीच्या टोळीचा पर्दाफाश; दोन आरोपी जेरबंद

शिर्डीतून दोघांना ताब्यात घेतल्यानंतर चोरीच्या १० दुचाकी जप्त; जालना, छत्रपती संभाजीनगर व परभणीतील ८ गुन्हे उघडकीस

जालना । प्रतिनिधी - जालना जिल्ह्यासह परिसरात मोटारसायकल चोरीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत दोन संशयित आरोपींना शिर्डी येथून ताब्यात घेतले आहे. पोलिसांच्या चौकशीत त्यांनी आणखी एका साथीदाराच्या मदतीने जालना शहरासह छत्रपती संभाजीनगर आणि परभणी जिल्ह्यात विविध ठिकाणांहून मोटारसायकली चोरी केल्याची माहिती समोर आली आहे. या कारवाईत पोलिसांनी विविध कंपन्यांच्या तब्बल १० मोटारसायकली जप्त केल्या असून त्यांची एकूण किंमत सुमारे ४ लाख ३० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. या कारवाईमुळे मोटारसायकल चोरीचे एकूण आठ गुन्हे उघडकीस आणण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पानशेंद्रा येथील संतोष भाऊराव पाचरणे यांची शाईन मोटारसायकल ११ ऑगस्ट २०२६ रोजी कणकेश्वर मंदिर परिसरातून अज्ञात चोरट्याने चोरून नेली होती. याप्रकरणी तालुका जालना पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५८९/२०२६, कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. मोटारसायकल चोरीच्या या गुन्ह्याचा तपास सुरू असताना चोरीची मोटारसायकल शिर्डी परिसरातील गणेश ऊर्फ संतोष शंकर शिंदे आणि सौरभ विक्की रोजझारिओ या व्यक्तींनी चोरल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली.

मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने २६ सप्टेंबर २०२६ रोजी शिर्डी, जि. अहिल्यानगर येथे कारवाई करून गणेश ऊर्फ संतोष शंकर शिंदे (रा. कालिकानगर, शिर्डी) आणि सौरभ विक्की रोजझारिओ (रा. शिर्डी) या दोघांना ताब्यात घेतले. पोलिसांनी दोघांची चौकशी केली असता, त्यांनी आणखी एका साथीदाराच्या मदतीने विविध ठिकाणांहून मोटारसायकली चोरी केल्याची माहिती दिल्याचे पोलिसांनी सांगितले. चौकशीत जालना शहरातील उढाण कॉम्प्लेक्स, लक्कडकोट तसेच परभणी आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील विविध ठिकाणांहून मोटारसायकली चोरी केल्याची माहिती समोर आली आहे.

पोलिसांनी आरोपींकडून युनिकॉर्न, शाईन, स्प्लेंडर, सुपर स्प्लेंडर, सी.डी. डॉन आदी विविध कंपन्यांच्या मोटारसायकली जप्त केल्या आहेत. जप्त केलेल्या १० दुचाकींची एकूण किंमत सुमारे ४ लाख ३० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. जप्त केलेल्या मोटारसायकलींच्या अनुषंगाने जालना जिल्ह्यातील तालुका जालना, सदर बाजार आणि कदीम जालना पोलीस ठाण्यांमध्ये, तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जिन्सी आणि एमआयडीसी सिडको पोलीस ठाण्यांमध्ये आणि परभणी जिल्ह्यातील मानवत पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांचा संबंध समोर आला आहे. या कारवाईत आतापर्यंत एकूण आठ गुन्हे उघडकीस आणण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. जप्त केलेल्या मोटारसायकलींच्या मूळ मालकांचा शोध घेऊन त्या त्यांना परत करण्याची प्रक्रिया तपासानंतर केली जाणार आहे.

या प्रकरणात आणखी एका साथीदाराचा सहभाग असल्याची माहिती चौकशीत समोर आल्याने पोलिसांकडून त्याचा शोध घेतला जात आहे. त्यामुळे मोटारसायकल चोरीच्या या प्रकरणात आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. आरोपींकडून चोरीच्या दुचाकी कुठे विकल्या जात होत्या, चोरीसाठी कोणत्या पद्धतीचा वापर केला जात होता आणि



या टोळीशी आणखी कोणाचा संबंध आहे का, याचा तपास सुरू आहे. ताब्यात घेतलेल्या दोन्ही आरोपींना जप्त मोटारसायकलींसह तालुका जालना पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले असून, पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी पंकज जाधव, पोलीस निरीक्षक राजेंद्र वाघ, पोलीस उपनिरीक्षक स्थागुशा जालना, तसेच सफौ. रामप्रसाद पव्हरे, पोलीस अंमलदार रमेश राठोड, प्रभाकर वाघ, कैलास खार्डे, रुस्तुम जैवाळ, ईरशाद पटेल, बाबा गायकवाड, संदीप चिंचोले, धीरज भोसले, वसंत धस आणि चालक अशोक जाधवर यांच्या पथकाने ही कारवाई केली.

सातबाऱ्यावर रस्त्याची नोंद करण्यासाठी लाच; तलाठी एसीबीच्या जाळ्यात

एक हजार रुपये स्वीकारताना वडवाळी सज्जाचे ग्राम महसूल अधिकारी ताब्यात; पैठण तहसील कार्यालयातील कारवाई

पैठण । संदीप नांद्रे - शेतीतील वहिवाटीच्या चार मीटर रस्त्याची नोंद सातबाऱ्यावर घेण्यासाठी एक हजार रुपयांची लाच स्वीकारल्याच्या आरोपावरून वडवाळी सज्जाचे ग्राम महसूल अधिकारी तथा तलाठी दिलीप उद्धवराव कांबळे (वय ५६) यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या छत्रपती संभाजीनगर पथकाने शुक्रवारी (दि. २५) पैठण तहसील कार्यालयात ताब्यात घेतले. ही कारवाई एसीबीच्या पथकाने पंचांसमक्ष केली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, तक्रारदार ६८ वर्षीय शेतकऱ्याची नायगाव शिवारातील गट क्रमांक ५६ मध्ये शेती आहे. या शेतीतील वहिवाटीच्या



चार मीटर रस्त्याची नोंद सातबाऱ्यावर घेण्यासाठी संबंधित तलाठ्याने लाचेची मागणी केल्याची तक्रार एसीबीकडे करण्यात आली होती.

तक्रारीची २३ सप्टेंबर रोजी पडताळणी करण्यात आली. यावेळी संबंधित कामासाठी एक हजार रुपयांची मागणी करण्यात आल्याचे तसेच तडजोडीनंतर एक हजार रुपये स्वीकारण्याचे पंचांसमक्ष मान्य झाल्याचे एसीबीच्या प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

त्यानंतर शुक्रवारी तक्रारदाराला पैठण तहसील कार्यालयात बोलावण्यात आले. पंचांसमक्ष एक हजार रुपये स्वीकारल्यानंतर एसीबीच्या पथकाने तलाठी दिलीप कांबळे यांना ताब्यात घेतले.

या प्रकरणी पैठण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिली आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचेही विभागाकडून सांगण्यात आले.

ही कारवाई पोलीस उपअधीक्षक विशाल बहात्तरे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. तपास पोलीस निरीक्षक अमोल सोनवणे करीत असून, पोलीस उपअधीक्षक प्रशांत पवार यांच्या पर्यवेक्षणाखाली पथकाने

कारवाई केली. पोलीस अधीक्षक माधुरी केदार-कांगणे व अपर पोलीस अधीक्षक शशिकांत सिंगारे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

अंतरवाली सराटीतील मराठा आंदोलनाचा तंबू हटवला

जालना । गणेश राऊत - जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षण आंदोलनाचे केंद्र राहिलेला मंडप, व्यासपीठ आणि संबंधित साहित्य शुक्रवार, २५ सप्टेंबरच्या रात्री हटवण्यात आले. जवळपास तीन वर्षांपासून या ठिकाणी आंदोलनाशी संबंधित उपक्रम सुरू होते.

२९ ऑगस्ट २०२३ रोजी मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषण सुरू केले होते. त्यानंतर हे ठिकाण मराठा आरक्षणाच्या आंदोलनातील महत्त्वाचे केंद्र म्हणून पुढे आले. या ठिकाणी विविध टप्प्यांवर उपोषणे, बैठका आणि आंदोलने झाली. १ सप्टेंबर २०२३ रोजी झालेल्या पोलिसांच्या लाठीचार्जच्या घटनेनंतर अंतरवाली सराटी परिसर राज्यभर चर्चेत आला होता.

ग्रामस्थांच्या चर्चेनंतर मंडप हटवण्याचा निर्णय

> ग्रामस्थांच्या निर्णयानंतर मंडप, व्यासपीठ आणि आंदोलनाचे साहित्य हटवले; पुढील आंदोलनाची दिशा पाटोदा असल्याचे मनोज जरांगे पाटील यांचे वक्तव्य

आंदोलनानंतर मंडप आणि व्यासपीठ कायम ठेवायचे की हटवायचे, याबाबत ग्रामस्थ, सरपंच आणि स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये चर्चा झाली. गावातील दैनंदिन व्यवहार, वाहतुकीची व्यवस्था आणि परिसर मोकळा ठेवण्याची गरज लक्षात घेऊन मंडप व व्यासपीठ हटवण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले.

त्यानुसार शुक्रवारी रात्री मंडप, बांबूचे साहित्य, व्यासपीठ तसेच इतर संबंधित साहित्य हटवण्यात आले.

पुढील आंदोलनाची दिशा पाटोदा?

मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटीतील आंदोलनाला विराम देण्याची भूमिका व्यक्त केली असून, यापुढील **पान २ वर**

मराठवाड्यातील ७४ तालुक्यांत दुष्काळ जाहीर

विविध उपाययोजना व सवलती लागू

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी - खरीप हंगाम २०२६ मध्ये पर्जन्यतूट आणि अन्य घटकांमुळे छत्रपती संभाजीनगर महसूल विभागातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी आणि हिंगोली या आठ जिल्ह्यांतील ७४ तालुक्यांमध्ये -१ (प्रथम कळ) लागू झाली असून दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. राज्य शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाने दि. २५ सप्टेंबर २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार संबंधित तालुक्यांमध्ये विविध उपाययोजना व सवलती लागू करण्यात आल्या आहेत. राज्यातील एकूण २६५ तालुक्यांचा यात समावेश आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ९ तालुके यात असून छत्रपती संभाजीनगर, कन्नड, सोयगाव, पैठण, वैजापूर, गंगापूर, खुलताबाद, सिल्लोड आणि फुलंब्री यांचा समावेश आहे. जालना जिल्ह्यातील ८ तालुक्यांमध्ये बदनापूर, घनसावंगी, अंबड, जालना, परतूर, मंठा, भोकरदन आणि जाफ्राबाद यांचा समावेश आहे. बीड जिल्ह्यातील ११ तालुक्यांमध्ये बीड, गेवराई, माजलगाव, केज, आंबेजोगाई, परळी, आष्टी, पाटोदा, शिरूर कासार, धारूर आणि वडवणी यांचा समावेश आहे. लातूर जिल्ह्यातील १० तालुक्यांमध्ये लातूर, औसा, अहमदपूर, निलंगा, उदगीर, चाकूर, रेणापूर, शिरूर अनंतपाळ, देवणी आणि जळकोट यांचा समावेश आहे. धाराशिव जिल्ह्यातील ८ तालुक्यांमध्ये धाराशिव, कळंब, भूम, वाशी, तुळजापूर, लोहारा, परंडा आणि उमरगा यांचा समावेश आहे. नांदेड जिल्ह्यातील १४ तालुक्यांमध्ये नांदेड, बिलोली, कंधार, लोहा, हदगाव, भोकर, देगलूर, किनवट, हिमायतनगर, माहूर, धर्माबाद, उमरी, अर्धापूर आणि नायगाव यांचा समावेश आहे. परभणी जिल्ह्यातील ९ तालुक्यांमध्ये पूर्णा, पालम, परभणी, सोनपेठ, जिंतूर, गंगाखेड, सेलू, मानवत आणि पाथरी यांचा समावेश आहे. हिंगोली जिल्ह्यातील ५ तालुक्यांमध्ये हिंगोली, औंढा नागनाथ, कळमनुरी, सेनगाव आणि वसमत यांचा समावेश आहे.

विविध सवलती व उपाययोजना लागू

शासन निर्णयानुसार या दुष्काळग्रस्त **पान २ वर**

जय भवानी गणेश मंडळाच्या विसर्जन मिरवणुकीत सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल

महाकाली लाईव्ह देखावा, कांतारा शो आणि ढोल-ताशा पथक ठरले आकर्षण; मंठ्यात शांततेत विसर्जन सोहळा

मंठा । गजानन माळकर - शिवसेना पुरस्कृत जय भवानी गणेश मंडळाच्या यंदाच्या गणेश विसर्जन मिरवणुकीत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. महाकाली लाईव्ह देखावा, कांतारा लाईव्ह शो आणि ढोल-ताशा पथकाच्या सादरीकरणामुळे मिरवणुकीला विशेष स्वरूप प्राप्त झाले. मिरवणूक पाहण्यासाठी शहरातील नागरिकांनी गर्दी केली होती. जय भवानी गणेश मंडळाचे यंदा ४२ वे वर्ष असून, धार्मिक कार्यक्रमांसोबत सामाजिक उपक्रमांची परंपरा जोपासली जात असल्याचे मंडळाकडून सांगण्यात आले. यंदाच्या विसर्जन मिरवणुकीत पारंपरिक कला व सांस्कृतिक सादरीकरणांचा समावेश करण्यात आला. मिरवणुकीची सुरुवात छत्रपती संभाजी राजे चौक येथून झाली. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक, मारोती मंदिर, मारवाडी गल्ली, बोराडे गल्ली, श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर आणि ब्राह्मण गल्लीमार्गे मिरवणूक पारंपरिक विसर्जनस्थळी पोहोचली. यावेळी गणेशभक्तांनी गणरायाला निरोप दिला. मिरवणुकीत ठाणे येथील शिवतांडव ढोल-ताशा पथकाने सादरीकरण केले. तसेच महाकाली लाईव्ह देखावा आणि अहिल्यानगर येथील पथकाने सादर केलेला कांतारा लाईव्ह शो हेही मिरवणुकीतील प्रमुख आकर्षण ठरले. जिल्हाप्रमुख ए. जे. बोराडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि इव्हेंट मॅनेजर चेतन घावट, ठाणे यांच्या नियोजनातून विसर्जन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, व्यापारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, शहरातील मुस्लिम बांधवांकडून मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचे स्वागत करण्यात आले. मिरवणूक शांततेच्या वातावरणात पार पडली. पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



संपादकीय पान

पोलिसांची कारवाई कौतुकास्पद; पण प्रतिबंधात्मक यंत्रणा आणखी मजबूत हवी

जालना शहरातील नवीन मोंढा हा केवळ बाजारपेठ नाही, तर जिल्ह्याच्या व्यापारी अर्थव्यवस्थेची महत्त्वाची नाडी आहे. दिवसभर गजबजणारा हा परिसर रात्री मात्र तुलनेने शांत होतो. याच काळाचा गैरफायदा घेत होलसेल किराणा दुकानाच्या छतावरील पत्रे कापून दुकानात प्रवेश करून रोख रक्कम आणि किराणा माल लंपास करण्याची घटना घडली. सुदैवाने चंदनझिरा पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत दोन दिवसांत संशयिताला ताब्यात घेतले आणि चोरीचा मुद्देमाल जप्त केला. पोलिसांची ही कारवाई निश्चितच तपास यंत्रणेच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. मात्र, चोर पकडला म्हणून प्रश्न संपत नाही; ज्या परिस्थितीत चोरी शक्य झाली, तो प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. चोरीची पद्धत लक्षात घेतली तर चोरट्याने दुकानाचे शटर किंवा मुख्य दरवाजा फोडण्याऐवजी छतावरील पत्रे कापून आत प्रवेश केला. याचा अर्थ दुकानाच्या सुरक्षेतील एका वेगळ्याच बाजूचा गैरफायदा घेतला गेला. व्यापाऱ्यांनी केवळ शटरला कुलूप लावले म्हणजे दुकान सुरक्षित झाले, अशी मानसिकता बदलण्याची वेळ आली आहे. छत, मागील बाजू, खिडक्या, वेंटिलेशनची जागा, शेजारील मोकळी जागा अशा ठिकाणांचीही सुरक्षा तपासणे आवश्यक आहे. दुकानाचे शटर मजबूत असताना छत कमजोर असेल, तर सुरक्षा अपुरीच! या घटनेनंतर सर्वात महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो तो म्हणजे नवीन मोंढा परिसरातील रात्रीच्या सुरक्षा व्यवस्थेचा. व्यापारी परिसरात नियमित पोलिस गस्त किती आहे? संवेदनशील ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत आहेत का? रात्रीच्या वेळी संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी कोणती यंत्रणा आहे? व्यापाऱ्यांनी याबाबत पोलिसांकडे पूर्वी तक्रारी किंवा मागण्या केल्या आहेत का? या प्रश्नांची उत्तरे केवळ या एका चोरीपुरती मर्यादित नसून संपूर्ण व्यापारी सुरक्षेच्या दृष्टीने शोधली पाहिजेत. अनेक व्यापारी प्रतिष्ठानांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवलेले असतात. मात्र कॅमेरा आहे म्हणजे सुरक्षा आहे, असा समज धोकादायक ठरू शकतो. कॅमेरा कार्यरत आहे का? रेकॉर्डिंग किती दिवस सुरक्षित राहते? रात्रीच्या अंधारात चित्र स्पष्ट दिसते का? दुकानाच्या छताकडे किंवा मागील बाजूकडे कॅमेऱ्याचे कव्हरेज आहे का? या बाबी तपासणे गरजेचे आहे. नवीन मोंढ्यासारख्या मोठ्या व्यापारी क्षेत्रात व्यापारी संघटना आणि पोलिस प्रशासनाने संयुक्तपणे सुरक्षा ऑडिट करण्याची वेळ आली आहे. कोणत्या ठिकाणी प्रकाशयोजना अपुरी आहे, कुठे सीसीटीव्हीची गरज आहे, कुठे रात्रीची गस्त वाढवण्याची आवश्यकता आहे, याचे नकाशीकरण केले जाऊ शकते. सुरक्षेची संपूर्ण जबाबदारी पोलिसांवर टाकून चालणार नाही. दुकान बंद करताना मोठ्या प्रमाणावर रोख रक्कम गल्ल्यात ठेवणे टाळणे, मजबूत लॉकिंग सिस्टीम वापरणे, छताची नियमित तपासणी करणे, अलार्म किंवा इतर सुरक्षा साधनांचा वापर करणे आणि सीसीटीव्हीची नियमित तपासणी करणे, या उपाययोजना व्यापाऱ्यांनीही करणे आवश्यक आहे. विशेषतः होलसेल बाजारपेठेत रात्री मोठ्या प्रमाणावर माल आणि रोकड असते. त्यामुळे अशा दुकानांची सुरक्षा सामान्य दुकानांपेक्षा अधिक मजबूत असणे अपेक्षित आहे. या प्रकरणात पोलिसांनी दुकानांमध्ये काम करणाऱ्या व्यक्तीबाबत मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे तपास पुढे नेला आणि संशयिताला ताब्यात घेतल्याचे सांगितले आहे.

पान १ वरुन

अंतरवाली सराटीतील ...

आंदोलनाचे केंद्र अन्य ठिकाणी हलवले जाऊ शकते, असे त्यांनी म्हटले आहे. सरकारकडून मागण्यांबाबत अपेक्षित निर्णय न झाल्यास पुढील आंदोलन पाटोदा येथून सुरू करण्याची भूमिका त्यांनी व्यक्त केल्याचे सांगण्यात आले.

अंतरवाली सराटी येथे सुमारे तीन वर्षे आंदोलनाशी संबंधित उपक्रमांचे केंद्र राहिलेला मंडप आता हटवण्यात आला आहे. त्यामुळे या ठिकाणच्या आंदोलनाच्या एका टप्प्याला विराम मिळाला असला, तरी मराठा आरक्षणाच्या मागणीसंदर्भातील पुढील घडामोडींकडे लक्ष लागले आहे.

मराठवाड्यातील...

भागांसाठी जमीन महसुलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती, कृषी पंपांच्या चालू वीजबिलात सूट आणि शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी अशा सवलती लागू करण्यात आल्या आहेत. ७.५ अश्वशक्तीपर्यंत क्षमतेच्या कृषी पंपांचे वीजबिल यापूर्वीच माफ करण्यात आले असून त्यावरील क्षमतेच्या पंपांना सदर सूट लागू राहणार आहे.

तसेच रोजगार हमी योजनेअंतर्गत कामांच्या निकषात शिथिलता आणून अधिकाधिक कामे सुरू करणे, आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे, टंचाई जाहीर केलेल्या गावांमध्ये शेतकऱ्यांच्या कृषी पंपांची वीज जोडणी खंडित न करणे, शेतीवर अवलंबून असलेल्या शेतकरी व मजुरांना अन्नधान्याची टंचाई भासणार नाही याची व्यवस्था करणे, जनावरांसाठी आवश्यक चाऱ्याची उपलब्धता करणे तसेच जलसंधारणाची कामे सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

पंचनामे तात्काळ सुरू करण्याचे निर्देश

-१ लागू झालेल्या राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये पंचनाम्याची कार्यवाही जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ सुरू करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत. सर्वेक्षण केलेल्या क्षेत्रातील पिकांची स्थिती दर्शविणारी छायाचित्रे आणि जीपीएस कोऑर्डिनेट संकलित करून पिकस्थितीचा अहवाल कृषी आयुक्तांमार्फत शासनास तात्काळ सादर करावयाचा आहे.

दरम्यान, संबंधित दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शेतपिकांच्या नुकसानीबाबतची मदत विहित कार्यपद्धतीची पूर्तता करून स्वतंत्र शासन निर्णयाद्वारे जाहीर केली जाणार असल्याचे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

पर्यटन जगासाठी सामाजिक, सांस्कृतिक, एकता आणि आर्थिक विकासाचा आधारस्तंभ

जागतिक संतुलन टिकवीण्यासाठी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी सर्वच देशांनी पर्यटनाला जास्त महत्त्व दिले पाहिजे.जगातील देशांना आर्थिकस्थिती बळकट करण्यासाठी पर्यटनाला चालना देण्याची नितांत गरज आहे. पर्यटनाचे महत्व आणि लोकप्रियता पाहून संयुक्त राष्ट्रसंघाने १९८० पासुन ''२७ सप्टेंबर विश्व पर्यटन दिवस'' साजरा करण्याची घोषणा करण्यात आली. कारण संयुक्त राष्ट्र संघाने २७ सप्टेंबर १९७० ला विश्व पर्यटन संघटनेचा संविधान स्वीकारला होता. जिवनामध्ये खुशी निर्माण व्हावी आणि आनंद मिळावा याकरिता पर्यटनस्थळांना भेट देने गरजेचे असते.पर्यटन फक्त जीवनात खुशीच निर्माण करत नाही तर सामाजिक, सांस्कृतिक,राजनैतिक, रोजगार निर्मिती आणि आर्थिक विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावुन बळकट करण्याचे काम करीत असते.आज अनेक देशांची अर्थव्यवस्था पर्यटनामुळे मजबूत झाल्याचे दिसून येते.भारत पर्यटनासाठी व पर्यटकांसाठी स्वर्ग तर विश्व शांतीचा दुत आहे.पर्यटन हे जागतिक प्रदुषण नियंत्रणाचे सुध्दा महत्वाचे काम करीत असते. त्यामुळे पर्यटनावर जेवढा जास्त भर दिल्या जाईल तेवढेच प्रदुषण कमी होईल व मानवजातीसह, जीवजंतू, वन्यप्राणी, जंगल संपदा यांना जीवदान व दिलासा मिळेल. त्यामुळे पर्यटनाला जास्त महत्व देण्याची गरज आहे.भारतात २८ राज्ये व ८ केंद्र शासीत प्रदेश आहेत. प्रत्येक राज्यात आपल्याला मोठ्या प्रमाणात पर्यटन स्थळे पहायला मिळतात. आजही लाखो विदेशी पर्यटक भारतात येतात व पर्यटनाचा आनंद घेतांना दिसतात. पर्यटस्थळे देशाला सुशोभित करतात व देशाच्या विकासाला हातभार लावण्याचे व चालना देण्याचे काम पर्यटनाच्या माध्यमातून नेहमी होत असते.भारतात लाखोंच्या संख्येने विदेशी पर्यटक नेहमी येत असतात. कारण जगाच्या पाठीवर भारतातील पर्यटनस्थळे ऐतिहासिक, पुरातन,नामांकित आणि जागतिक वारसा मिळालेले सुशोभित स्थळे आहेत.यामुळे भारताला विदेशी चलन मोठ्या प्रमाणात प्राप्त होते. भारतातील पर्यटनामुळे विदेशी पर्यटकांचे मन मोहून जाते. भारतातील पर्यटकसुध्दा अनेक रम्य ठिकानांणा भेट देऊन आपली उपस्थिती नोंदवीतात.पर्यटनाला चालना मिळावी व रोजगार मिळावा या उद्देशाने देशातील प्रत्येक नागरिकांनी दरवर्षी १० पर्यटन स्थळांना भेट देऊन भारताचा सन्मान वाढवावा.भारतातील राजे-महाराजे यांचे साहित्य, किल्ले,काश्मिरसारखी पर्यटनस्थळे,देवी-देवतांची नामांकित स्थळे,ताजमहल,कुतुबमिनार,बुध्दगया सारखी अनेक ऐतिहासिक स्थळे भारतात आहेत.जगात अनेक महत्वपूर्ण ठिकाणे आहेत.परंतु काही पर्यटन ठिकाणे निसर्गाचे संतुलन बिघडल्यामुळे दुर्लक्षित होतांना दिसतात.ती वाचविण्यासाठी जगातील प्रत्येक देशांनी पुढाकार घेतला पाहिजे व पर्यटनाला चालना दिली पाहिजे. वाढते प्रदुषण, ग्लोबल वॉर्मिंग, अलनिनोचा प्रभाव,प्लास्टिकचे दुष्परिणाम, जगातील वाढते तापमान, भुकंप, सुनामी, महाप्रलय, ज्वालामुखीचा उद्रेक, वाढती लोकसंख्या यामुळे पर्यटनस्थळांवर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम होतो व याचा दुष्परिणाम पर्यटकांवर होत असतो. याला कुठेतरी रोखण्याची गरज आहे. याकरिता संपूर्ण जगाने विचार मंथन करण्याची गरज आहे. जगातील वाढत्या तापमानामुळे मोठमोठी ग्लेशिअर वितळत आहे आणि याचे जिवंत उदाहरण आपल्याला २६ ऑगस्ट २०२६ ला नेपाळमध्ये महाप्रलयाच्या रूपात दिसून आले.यामुळे पर्यटनावर,पर्यटकांवर आणि निसर्गावर विपरीत परिणाम होतांना दिसतो.आज भारतातील व जगातील सर्वात मोठे पर्यटनस्थळ म्हणून गुजरात मधील नर्मदा नदीच्या काठावर लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा ''स्टॅच्यु ऑफ युनिटी'' भव्य पुतळा उभारण्यात आला आहे.या व्यतिरिक्त भारतात इतकी पर्यटनस्थळे आहेत की त्यांची तुलना करने कठीण आहे.भारतात गडकिल्ले, पुरातन भव्य मंदिरे,अजंठा-वेरूळ सारख्या लेण्या, बौध्दगया, कुतुबमिनार,ताजमहाल इत्यादी अनेक हजारो ऐतिहासिक ठिकाणे पर्यटनाच्या बाबतीत प्रसीध्द आहे. आज जगाच्या दृष्टीकोणातुन विचार केला तर संपूर्ण भारतच पर्यटन स्थळाचा केंद्र बिंदू आहे.भारतात पर्यटन स्थळी देव-दानव, ऋषि-मुनी, साधु-संत, वेषभुषा, पुजापध्दती, भारतीय संस्कृती, विविध भाषा, थोरमहात्म्यांचा, क्रांतीकारकांचा व विविध धर्मांचा इतिहास अशा अनेक वेगवेगळ्या पध्दती, मनोरंजनात्मक, साहित्य, पौराणिक कथा, इतिहास व संस्कृतीचे दर्शन भारतातील पर्यटन स्थळी पहायला मिळते व पर्यटकांचे मन मोहून जाते. भारतात अनेक धर्माचे व पंथाचे लोक रहात असल्यामुळे याठिकाणी वेगवेगळ्या पध्दतीची पर्यटनस्थळे भाषा सुध्दा पहायला मिळते.भारतातील खान-पानाच्या पध्दतीचा विदेशी पर्यटक मोठ्या आनंदाने स्वाद घेतात. भारतातील इतिहास आहे की एकट्या महाराष्ट्रात ३१७ गडकिल्ले आहेत यातील फक्त ९६ गडकिल्ले पर्यटनस्थळे आहेत.परंतु आजही २२१ गडकिल्ले पर्यटनाची व पर्यटकांची प्रतिक्षा करीत आहे.यावर महाराष्ट्र सरकारने विचार करून संपूर्ण गडकिल्ले हेरिटेज,लग्नसमारंभ,मनोरंजनात्मक कार्यक्रम याकरिता भाडे तत्वावर देवु नये.यामुळे पर्यटनस्थळांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ शकते.याला नाकारता येत नाही. सरकारने स्वत:चे पैशे खर्च करून पर्यटनासाठी सुशोभित केले पाहिजे.यातच महाराष्ट्राचा गौरव आहे.यामुळे भारतातील पर्यटनामध्ये महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक लागेल.कारण महाराष्ट्राचा इतिहास अजरामर आहे.भारतात आजही औरंगाबादला (संभाजीनगरला)''पर्यटनसिटी''म्हणुन संबोधल्या जाते. त्यामुळे पर्यटनाला जास्त महत्त्व देण्याची गरज आहे.कारण यामुळे पर्यटकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण होते.आता नुकतेच महाराष्ट्र सरकारने नागपूर जिल्ह्याला ''पर्यटन जिल्हा'' घोषित केल्याने प्रभु रामचंद्राची पावन स्थळी रामटेक येथील खिंडसी जलक्रीडा केंद्र व रामधाम तिर्थक्षेत्राला याला नवी ओळख मिळाली आहे आणि सोबतच नागपूर जिल्ह्यातील नामांकित स्थळांना आगळेवेगळे रूप आल्याचे दिसून येते. आज संपूर्ण विश्वाला पर्यटन वाढविण्यासाठी सामोर येण्याची गरज आहे.यामुळे जगात प्रदुषणमुक्त वातावरण निर्माण होईल,प्रत्येक देशात मित्रता वाढेल, पर्यावरणात सुधारणा होण्यास मदत होईल.सध्याच्या परिस्थितीत जे-जे देश युध्दामध्ये किंवा गृहयुद्धात जखडले आहेत त्या-त्या देशावर पर्यटनाच्या बाबतीत प्रश्न चिन्ह उपस्थित झालेला आहे.त्यामुळे पर्यटनाला चालना देण्यासाठी संपूर्ण देशांनी शांततेचा मार्ग अवलंबला पाहिजे. मानवजाती, जीवसृष्टी,वन्यप्राणी, पशुपक्षी,स्थल,जल,वायु यांना जीवीत ठेवण्याकरिता व प्रदुषणावर मात करण्यासाठी जगाने पर्यटनाला प्रथम स्थान देवून पर्यटकांचे आकर्षण वाढविण्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करण्याची गरज आहे. पर्यटन दिनाचे औचित्य साधून प्रत्येक देशांनी आजच्या दिवशी पर्यटकांच्या हस्ते व सरकारच्या हस्ते मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करायला पाहिजे.यामुळे पर्यटकांमध्ये नवीन आशा-अपेक्षा,आकांक्षा,नवीदिशा निर्माण होईल.भारत सरकारने जागतिक पर्यटन दिवसांच्या निमित्ताने सरकारने, प्रशासनाने आणि सामाजिक संस्थांनी वृक्षलागवडीचा संकल्प घेतला पाहिजे.यामुळे पर्यटनात मोठ्या प्रमाणात भर पडल्याचे दिसून येईल.

रमेश कृष्णराव लांजेवार
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

उपोषण की 'वैद्यकीय पॅकेज'? डॉक्टरांनी सांगावे!

उपोषण म्हणजे उपोषण! त्यात अन्न नाही, पाणी नाही आणि शरीर मात्र आंदोलनाच्या मागणीसाठी सरकारशी दोन हात करणार. ही झाली पारंपरिक व्याख्या. पण आजकालच्या आधुनिक उपोषणाची व्याख्या थोडी अपडेट करावी लागेल की काय, असा प्रश्न मनात येतो! मनोज जरांगे पाटील यांच्या वीस दिवसांच्या उपोषणाच्या निमित्ताने हा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. २९ ऑगस्टपासून उपोषण सुरू असल्याचे वृत्त होते. विशेष म्हणजे त्यांच्या आरोग्यावर लक्ष ठेवण्यासाठी २४ तास वैद्यकीय पथक तैनात असल्याचे जिल्हा प्रशासनानेच सांगितले होते.

म्हणजे व्यवस्था अगदी चोख होती!

उपोषणकर्ता तिथे, डॉक्टर तिथे, वैद्यकीय पथक तिथे, तपासण्या तिथे आणि सलाईनही तिथे!

मग सामान्य माणसाच्या मनात एक साधा प्रश्न निर्माण होतोया सगळ्या तपासण्यांमध्ये नेमके काय-काय नोंदवले गेले?

उपोषणाच्या काळात रक्तदाब किती होता? रक्तातील साखर किती होती? वजन किती कमी झाले? शरीरातील पाणी किती कमी झाले? इलेक्ट्रोलाइट्सची स्थिती काय होती? किती सलाईन देण्यात आली? किती वेळा दिली? कोणती औषधे दिली? पाणी किंवा अन्य द्रव किती घेतले?

हे सगळे डॉक्टरांच्या नोंदवहीत असणारच!

कारण डॉक्टर म्हणजे लग्नातला फोटोग्राफर नाही की फक्त फोटो काढून निघून गेला!

उपोषण करणाऱ्या व्यक्तीची वैद्यकीय तपासणी म्हणजे केवळ ''प्रकृती कशी आहे?'' असा प्रश्न विचारणे नव्हे. त्यामध्ये वस्तुनिष्ठ वैद्यकीय नोंद असते. आणि जर एखाद्या व्यक्तीने अन्न-पाणी त्यागल्याचा दावा केला असेल, तर त्याचा शरीरावर होणारा परिणाम वैद्यकीय तपासण्यांतून दिसायलाच हवा.

इथे एक गंमत आहे.

एका वृत्तानुसार ८ सप्टेंबरला त्यांच्या आरोग्यावर लक्ष ठेवण्यासाठी वैद्यकीय पथक कार्यरत होते आणि त्या दिवशी सात बाटल्या आयव्ही द्रवाची सलाईन देण्यात आली होती; त्यानंतर आणखी एक सलाईन देण्यात आल्याची माहितीही जिल्हा आरोग्य यंत्रणेने दिली.

म्हणजे उपोषणात 'जेवणाचे ताट' नसले तरी वैद्यकीय व्यवस्थेचा 'द्रव आहार विभाग' चांगलाच सक्रिय होता!

याचा अर्थ उपोषण खोटे होते असा निष्कर्ष काढण्याचे कारण नाही. सलाईन ही अन्नाची जागा घेणारी गोष्ट नाही आणि वैद्यकीय उपचार घेणे म्हणजे उपोषण मोडणे असेही सरसकट म्हणता येत नाही. पण उपोषणाची वैद्यकीय नोंद पारदर्शक असली पाहिजे, एवढा साधा प्रश्न नक्की वचिारता येतो.

आणखी एक मनोरंजक बाब म्हणजे काही वृत्तांनुसार उपोषणाच्या सुरुवातीच्या काळात वैद्यकीय तपासणी नाकारण्यात आली होती.

अहो, मग डॉक्टरांनी तपासणी करायची कशी?

उपोषणकर्त्याने म्हटले, ''तपासणी नको.''

डॉक्टर म्हणाले, ''ठीक आहे.''

मग जनता म्हणणार, ''आम्हाला माहिती द्या.''

डॉक्टर म्हणणार, ''आमच्याकडे नोंद नाही.''

आणि शेवटी सोशल मीडिया म्हणणार, ''माझ्याकडे सगळा पुरावा आहे!''

लोकशाहीतील हा 'वैद्यकीय व्हॉट्सॲप विद्यापीठ' बंद करण्याची वेळ आली आहे!

१६ सप्टेंबरच्या वृत्तांनुसार उपोषणाच्या १९व्या दिवशी रक्तदाब आणि रक्तातील साखर कमी झाल्याचे, तसेच प्रकृती खालावल्याचे सांगण्यात आले आणि रुग्णालयात दाखल होण्याचा सल्ला देण्यात आला. १७ सप्टेंबरला वीस दिवसांचे उपोषण संपवून त्यांना उपचारासाठी गॅलेक्सी रुग्णालयात नेण्यात आले.

यावरून एक गोष्ट स्पष्ट होतेवैद्यकीय हस्तक्षेप झाला होता. त्यामुळे आता प्रश्न आरोपांचा नसून नोंदींचा आहे. सरकारने किंवा संबंधित आरोग्य यंत्रणेने जर उपोषणाच्या काळातील वैद्यकीय अहवालाचा संक्षिप्त तपशील सार्वजनिक केला, तर अनेक प्रश्न आपोआप संपतील.

उपोषणकर्त्याने अन्न घेतले का?

पाणी किती घेतले?

सलाईन किती घेतली?

औषधे कोणती घेतली?

रक्तातील साखर दिवसेंदिवस कशी बदलली?

वजन किती कमी झाले?

रुग्णालयात दाखल होण्याची वैद्यकीय गरज काय होती?

आणि सर्वांत महत्त्वाचेरुग्णालयातील उपचारांचा खर्च कोणी केला?

या प्रश्नांची उत्तरे मिळाली की ना कोणाला 'सोंग' म्हणावे लागेल, ना कोणाला 'महात्मा' बनवावे लागेल.

कारण लोकशाहीत सत्याला प्रसिद्धीपत्रकाची गरज नसते; नोंदी पुरेशा असतात!

उपोषण ही लोकशाहीतील गंभीर आंदोलनाची पद्धत आहे. तिची थट्टा होऊ नये. पण उपोषणाच्या नावाखाली जनतेच्या भावनांशी खेळ होतोय का, याची शंका निर्माण होणार असेल तर प्रशासनाने ती शंका दूर केली पाहिजे.

उद्या प्रत्येक राजकीय किंवा सामाजिक आंदोलनात नवा फॉर्म्युला आला ''वीस दिवस उपोषण, त्यानंतर वीस दिवस रुग्णालय!''

तर लोक विचारतील, ''हे आंदोलन आहे की विस्तारित वैद्यकीय मुक्काम?''

आणि जर त्यात सरकारी पैसा वापरला जात असेल, तर करदाताही विचारेल

''साहेब, आंदोलनाचे बिल वेगळे आणि रुग्णालयाचे बिल वेगळे ना?''

म्हणून व्यक्ती कोणतीही असो, मागणी कोणतीही असो आणि सरकार कोणतेही असोएक नियम सर्वांसाठी समान असला पाहिजे.

उपोषण करा; पण वैद्यकीय नोंदी ठेवा.

आंदोलन करा; पण पारदर्शकता ठेवा.

सरकारी उपचार घ्या; पण खर्चाचा हिशेब द्या.

कारण शेवटी जनता एवढेच म्हणेल

''उपोषण तुमचे; पण डॉक्टर आणि बिल जर आमचे असतील, तर तपासणीची पावती आम्हालाही पाहिजे!''

- डॉ. भारत कन्हाड,
सामाजिक आणि राजकीय विश्लेषक, पुणे.

जालना जिल्ह्यात दुष्काळ जाहीर; आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या पाठपुराव्याला यश

जालना विधानसभा मतदारसंघासह जिल्ह्याचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश; शेतकऱ्यांना मोठा दिलासा

जालना । प्रतिनिधी - राज्यातील अनेक भागांत निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला आहे. या निर्णयात जालना विधानसभा मतदारसंघासह जालना जिल्ह्याचा समावेश झाल्याने जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

यंदाच्या खरीप हंगामात पावसाने मोठा खंड दिल्याने जालना जिल्ह्यातील शेतीपिकांवर त्याचा गंभीर परिणाम झाला. सोयाबीन, कापूस, मूग, उडीद यांसह विविध खरीप पिकांचे उत्पादन बाधित झाले आहे. पावसाच्या अनिश्चिततेमुळे शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट निर्माण झाले असून, दुष्काळ जाहीर करण्याची मागणी विविध स्तरांतून करण्यात येत होती.

या पार्श्वभूमीवर **आमदार अर्जुनराव खोतकर यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा केल्याची माहिती त्यांच्या समर्थकांकडून देण्यात आली आहे.** जालना जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी, पिकांचे पंचनामे करण्यात यावेत तसेच पाणी, चारा आणि इतर आवश्यक उपाययोजना राबवाव्यात, यासाठी त्यांनी शासनाचे लक्ष वेधले होते.



जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची तीव्रता यापूर्वीही समोर आली होती. पिकांची स्थिती चिंताजनक झाल्याने पिकांचे पंचनामे, पाणीटंचाई निवारण तसेच जनावरांसाठी चारा-पाण्याची व्यवस्था करण्याची मागणी करण्यात आली होती.

दुष्काळ जाहीर झाल्यानंतर कोणत्या उपाययोजना होऊ शकतात? दुष्काळी परिस्थिती घोषित झाल्यानंतर शासनाच्या निकषांनुसार संबंधित भागात विविध सवलती व उपाययोजना लागू होऊ शकतात. यामध्ये प्रामुख्याने

जमीन महसुलात सूट, पीक कर्जाच्या वसुलीस स्थगिती किंवा पुनर्गठनासंबंधी उपाययोजना, कृषीपंपांच्या वीजबिलाबाबत सवलती, विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्काबाबत सवलत किंवा माफी, रोजगार हमीच्या कामांना प्राधान्य, आवश्यकतेनुसार अन्नधान्याचा पुरवठा, पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची व्यवस्था, जनावरांसाठी चारा व पाण्याची व्यवस्था, पिकांच्या नुकसानीचे पंचनामे व शासनाच्या मदतीसाठी पुढील कार्यवाही, यापैकी प्रत्यक्ष लाभाची अंमलबजावणी संबंधित शासन निर्णय, निकष आणि स्थानिक प्रशासनाच्या कार्यवाहीवर अवलंबून असेल.

''दुष्काळ जाहीर केल्याबद्दल शासनाचे आभार''

दुष्काळ जाहीर झाल्यानंतर आमदार अर्जुनराव खोतकर यांनी शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेतल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांचे आभार व्यक्त केले. तसेच महाराष्ट्राचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांचेही जालना जिल्ह्याच्या वतीने आभार मानले. आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या निवेदनानुसार, **''बळीराजावर संकट आले असताना शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेत दुष्काळ जाहीर केल्याबद्दल मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री मा. श्री. एकनाथजी शिंदे व उपमुख्यमंत्री मा. सुनेत्राताई पवार यांचे मनःपूर्वक आभार. या निर्णयामुळे दुष्काळग्रस्त शेतकरी बांधवांना मोठा दिलासा मिळणार आहे. शेतकरी हितासाठी घेतलेल्या या महत्त्वपूर्ण निर्णयाचे मनापासून स्वागत!''**

आता जालना जिल्ह्यात दुष्काळी उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी, पिकांच्या नुकसानीचे पंचनामे, पाणीटंचाई निवारण, जनावरांसाठी चारा-पाण्याची उपलब्धता आणि शासनाच्या मदतीचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे महत्त्वाचे ठरणार आहे.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शासनाकडून जाहीर होणाऱ्या मदतीकडे जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले असून, प्रशासनाने दुष्काळी उपाययोजना तातडीने राबवाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

भूजल व्यवस्थापनासाठी शाश्वत उपाययोजनांवर भर

जालना - प्रतिनिधी

जिल्ह्यातील घटती भूजल पातळी लक्षात घेता कृत्रिम भूजल पुनर्भरण, योग्य पीक पद्धती व सूक्ष्म सिंचनाचा अधिकाधिक वापर करण्याची गरज केंद्रीय भूजल मंडळाच्या एकदिवसीय कार्यशाळेत व्यक्त करण्यात आली. यावेळी राष्ट्रीय जलधारक स्तर नकाशांकन व व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत जालना जिल्ह्याचा अहवाल अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांच्या हस्ते प्रसिद्ध करण्यात आला.

केंद्रीय भूजल मंडळ, नागपूर, जलशक्ती मंत्रालय, भारत सरकार, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, जालना, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकारी कार्यालयात ही कार्यशाळा घेण्यात आली. जिल्ह्यातील भूजल पातळीत घट होण्यामागे मागील १५ वर्षांतील पर्जन्यमानातील घट, सिंचन विहिरींच्या संख्येत झालेली वाढ व भूजलाचा वाढता उपसा ही प्रमुख कारणे असल्याचे यावेळी सांगण्यात आले. भूजल पातळीत सातत्याने घट होत राहिल्यास भविष्यात भूजल उपलब्धतेची परिस्थिती अधिक गंभीर



होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. भूजल संसाधनांचे शाश्वत व्यवस्थापन करण्यासाठी कृत्रिम भूजल पुनर्भरणाच्या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. पुनर्भरणासाठी योग्य स्थळांची निवड करताना भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा तसेच केंद्रीय भूजल मंडळाचे तांत्रिक मार्गदर्शन घेणे महत्त्वाचे आहे. योग्य ठिकाणी पुनर्भरण संरचना उभारल्यास भूजल पातळी वाढण्यास व भूजल साठ्याचे संवर्धन करण्यास मदत होऊ शकते. केंद्रीय भूजल मंडळ संपूर्ण भारतात, तर भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा महाराष्ट्रात जिल्हास्तरावर भूजलविषयक कार्य करते.

जालना जिल्ह्यातील भूजलाच्या गुणवत्तेत होत असलेली घसरण व त्याचे संभाव्य दुष्परिणाम याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. शेतीत रासायनिक खतांचा अतिवापर तसेच कीटकनाशके व इतर रसायनांचा अयोग्य वापर केल्यास जमिनीत नायट्रेटचे प्रमाण वाढू शकते. नायट्रेट भूजलात मिसळल्यास पाण्याच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम होऊ शकतो. नायट्रेटयुक्त पाण्याच्या वापरामुळे विशेषतः लहान बालकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊन मेथेमोग्लोबिनेमियासारख्या आरोग्यविषयक समस्या उद्भवू शकतात. भूजलाच्या अतिवापरामुळे जमिनीची क्षारता वाढून पिकांच्या वाढीवर व मातीच्या पाणीधारण क्षमतेवर परिणाम होऊ शकतो. उपलब्ध भूजल संसाधनांची स्थिती लक्षात घेऊन योग्य पीक पद्धतीचा अवलंब, पिकांच्या पाण्याची गरज लक्षात घेऊन पीक नियोजन तसेच ठिबक व तुषार सिंचनाचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहन करण्यात आले. उपलब्ध भूजलाचा योग्य व काटकसरीने वापर, भूजल पुनर्भरणाच्या उपाययोजना तसेच पीक व सिंचन पद्धतीत आवश्यक बदल याबाबतही कार्यशाळेत माहिती देण्यात आली. केंद्रीय भूजल मंडळाचे भूजल वैज्ञानिक अधिकारी हितेश रामटेके, शालिनी तिवारी व चित्रांश कोठारी यांनी मार्गदर्शन केले. केंद्रीय भूजल मंडळाच्या संकेतस्थळावरील माहितीच्या आधारे जालना जिल्ह्यातील भूजल संसाधनांचे शास्त्रीय पद्धतीने व्यवस्थापन, संवर्धन व नियोजन करण्यासाठी राष्ट्रीय जलधारक स्तर नकाशांकन व व्यवस्थापन कार्यक्रमाचा अहवाल उपयुक्त ठरणार असल्याचे सांगण्यात आले.

कार्यशाळेस कृषी, जलसंपदा, मृद व जलसंधारण, लघु पाटबंधारे तसेच सिंचन व ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, जालना व भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते. कार्यशाळेच्या आयोजनासाठी भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे वरिष्ठ भूवैज्ञानिक डॉ. कैलास आहेर, सहाय्यक भूवैज्ञानिक गिरीधरा सी.एच., डॉ. कृष्णा देशपांडे, कनिष्ठ भूवैज्ञानिक डॉ. संदीप सिरसाट, मोहसीन शेख तसेच अन्य कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

लिटल स्टार इंग्लिश स्कूल माहोरा येथे गणरायाला भावपूर्ण निरोप....

विद्यार्थ्यांच्या भक्तिमय वातावरणात महाआरती; ''बाप्पा, पुढच्या वर्षी लवकर या...!''चा जयघोष

जाफराबाद - प्रतिनिधी

माहोरा येथील लिटल स्टार इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या वतीने मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने विराजमान करण्यात आलेल्या लाडक्या गणरायाला भावपूर्ण निरोप देण्यात आला. गणपती विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर शाळेच्या परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. यावेळी गणरायाची महाआरती शाळेच्या प्राचार्या अनिता नवले मॅडम यांच्या हस्ते मोठ्या भक्तिभावाने करण्यात आली.

विद्यार्थ्यांनीही महाआरतीमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेत गणरायाच्या चरणी नतमस्तक होऊन आशीर्वाद घेतला.

गणरायाला निरोप देताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उत्साहासोबतच भावुकता दिसून आली. ''गणपती बाप्पा मोरया... पुढच्या वर्षी लवकर या!'' या जयघोषाने शाळेचा परिसर दुमदुमून गेला. यावेळी बाप्पाच्या चरणी नतमस्तक होऊन सर्व विद्यार्थ्यांना सुख, समाधान, उत्तम आरोग्य, यश आणि समृद्धी लाभावी, अशी मनोभावे प्रार्थना करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या संस्कारक्षम जडणघडणीत धार्मिक व सांस्कृतिक मूल्यांची जपणूक व्हावी, या भावनेतून शाळेत गणेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते. अखेर ''बाप्पा, पुढच्या वर्षी लवकर या!'' अशी भावपूर्ण साद घालत लाडक्या गणरायाला निरोप देण्यात आला.

राष्ट्रीय सेवा योजना दिन उत्साहात साजरा

भोकरदन - प्रतिनिधी

स्व. ॲड. भाऊसाहेब देशमुख वरिष्ठ महाविद्यालय, जोमाळा येथे २४ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय सेवा योजना () स्थापना दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात एनएसएस ध्वजाच्या ध्वजारोहणाने झाली.प्राचार्य डॉ. विश्वास तळेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात त्यांनी 'मी नव्हे तर तुम्ही' या ब्रीदवाक्याचा उल्लेख करत विद्यार्थ्यांनी समाजसेवा, राष्ट्रप्रेम व नेतृत्वगुण जोपासावेत, असे आवाहन केले. यावेळी प्राचार्य के. एस. अपार, रोशन देशमुख, एच. व्ही. नागरगोजे



व ऋषिकेश देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. स्वयंसेवक, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी समाजहिताची प्रतिज्ञा घेतली.

मंजुळ आवाजाचे पार्श्वगायक एस पी बालसुब्रमण्यम

हिंदी चित्रपटसृष्टीतील मंजुळ आवाजाचे पार्श्वगायक एस पी बालसुब्रमण्यम यांचा आज स्मृतिदिन. सहा वर्षापूर्वी २५ सप्टेंबर २०२० रोजी वयाच्या ७४ व्या वर्षी एस पी बालसुब्रमण्यम यांचे कोरोनाने निधन झाले होते. त्यांच्या निधनाने रसिकांनी हळहळ व्यक्त केली होती कारण एस पी बालसुब्रमण्यम हे रसिकांचे आवडते पार्श्वगायक होते. त्यांचे निधन रसिकांना चटका लावून जाणारे ठरले. एस पी बालसुब्रमण्यम यांचा जन्म ४ जून १९४६ रोजी आंध्रप्रदेश मधील नेल्लोर येथील मेहुआ या गावी झाला. त्यांचे पूर्ण नाव श्रीपती पंडिताध्युला बालसुब्रमण्यम असे होते. एस पी बालसुब्रमण्यम यांचे वडील हरिकथा गायक होते. आंध्रप्रदेश मधील हे पारंपरिक लोकसंगीत आहे त्यात कविता, कथा, गायन, नृत्य यासह सर्व प्रकारांचा समावेश असतो. एस पी बालसुब्रमण्यम यांचे वडील नाटकातही काम करत. एस पी यांना एक भाऊ व दोन बहिण आहेत. एस पी यांनी मोठे होऊन इंजिनिअर व्हावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती पण ती पूर्ण होऊ शकली नाही. एस पी बालसुब्रमण्यम यांना लहानपणापासूनच गायनाची आवड होती त्यामुळे त्यांनी गायनातच करिअर करायचे असे ठरवले आणि त्यांनी व्यावसायिक गायनास सुरुवात केली. १९६४ साली त्यांना गायनात पहिले पारितोषिक मिळाले. त्यानंतर त्यांचे नाव सर्वदूर पोहचले. सुरुवातीला त्यांनी आपल्या मातृभाषेत म्हणजे तेलगू भाषेत गाणी गायला सुरुवात केली नंतर त्यांनी तमिळ, मल्याळम आणि कन्नड या दक्षिण भारतीय भाषेतही गाणी गायला सुरुवात केली. दक्षिणात्य भाषेत त्यांनी गायलेली गाणी लोकप्रिय होऊ लगली. त्याची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढू लागली. त्यांच्या मंजुळ आवाजाने रसिकांना वेड लावले. त्यांचा आवाज आणि त्यांनी गायलेली गाणी रसिकांना इतकी आवडली की रसिकांनी त्यांना दक्षिणेतील. मोहम्मद रफी अशी पदवी दिली. दक्षिणेकडून त्यांनी आपला मोर्चा हिंदी चित्रपट सृष्टीकडे वळवला. हिंदी चित्रपट सृष्टीत प्रवेश केल्यावर त्यांना एक दुजे के लिये या चित्रपटात गाण्याची संधी मिळाली. या चित्रपटात त्यांनी गायलेली सर्व गाणी खूप गाजली. आजही या चित्रपटातील त्यांनी गायलेली गाणी प्रेक्षकांच्या ओठावर आहेत. या चित्रपटात त्यांनी गायलेले हम बने तुम बने एक दुजे के लिये.... या गाण्यासाठी त्यांना सर्वोत्कृष्ट पार्श्वगायकचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. एस पिंच्या पहिल्याच चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याने त्यांचे नाव देशभर झाले. एस पी बालसुब्रमण्यम यांनी गायलेल्या पहिल्याच चित्रपटातील गाणी गाजल्याने त्यांना अनेक चित्रपटात गाण्याची संधी मिळाली. अनेक संगीतकार त्यांना आपल्याकडे गाणी गाण्यासाठी गळ घालू लागले. पुढे त्यांनी अनेक चित्रपटात गाणी गायली ती गाणी लोकप्रियही झाली. हिंदी चित्रपट सृष्टीत त्यांचे आता चांगले बस्तान बसले. पत्थर के फुल, बागी, हम आपके है कौन? साजन, रोजा या चित्रपटात त्यानी गायलेली गाणी खूप गाजली. सलमान खानचा पहिला चित्रपट असलेल्या मैने प्यार किया या चित्रपटात त्यांनी सलमानचा आवाज बनून गाणी गायली. या चित्रपटात त्यांनी गायलेली सर्व गाणी खूप गाजली. सलमान खानला सुपरस्टार करण्यात एस पी बालसुब्रमण्यम यांचा मोलाचा वाटा होता असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. सलमान खानच्या अनेक गाण्यांना त्यांचाच आवाज होता. सलमान खान आणि एस पी हे जणू एकाच नाण्याच्या दोन बाजू होते. १९९० च्या दशकात त्यांनी गायलेली सर्वच गाणी लोकप्रिय झाली. एस पी यांनी १६ भाषांमधून ४० हजारांहून अधिक गाणी गायली. ८ फेब्रुवारी १९८१ रोजी सकाळी ९ ते रात्री ९ अशा १२ तासात तब्बल २१ कन्नड गाणी रेकॉर्ड करून त्यांनी विश्वविक्रम केला जो गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंदला गेला. एस पी यांनी जवळपास पाच दशके आपल्या मंजुळ आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या आवाजाची मोहिनीच अशी होती की जो त्यांचा आवाज ऐकेल तो त्यांच्या प्रेमात पडेल. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. त्यांना तब्बल अर्धा डझन राष्ट्रीय पुरस्कार मिळाले. शिवाय अनेक फिल्मफेअर, स्क्रीन पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांना पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन गौरवले. रसिकांचे आवडते आणि रसिकांच्या मनात आदराचे स्थान असलेल्या या गायकाचे कोरोनाने अचानक निधन झाल्याने रसिकांना मोठा धक्का बसला होता. मंजुळ आवाजाचे जेष्ठ पार्श्वगायक एस पी बालसुब्रमण्यम यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

गुगल गुरू चा वाढदिवस!

आजचे युग हे इंटरनेटचे युग आहे. इंटरनेट म्हणजे माहितीचा खजिना. इंटरनेटवर कोणतीही माहिती एका क्लिकवर उपलब्ध असते. कोणतीही माहिती शोधायची असेल तर गुगलवर सर्च केले जाते. अभ्यासाच्या काही नोट्स काढायच्या असतील किंवा काही संदर्भ शोधायचे असेल तर गुगलला सर्च केले जाते. गुगलही क्षणात हवी ती माहिती पुरवते म्हणूनच गुगलला गुरु असे म्हटले जाते. गुगल गुरूमुळे माहितीचा महास्फोट झाला आहे. गुगल म्हणजे इंटरनेट वरील एक विश्वच आहे. आज त्याच गुगल गुरू चा वाढदिवस आहे.

अमेरिकेतील मेनलो पार्कमधील सुसान वेजोसिकी गॅरेजमध्ये लॅरी पेज व सर्जेई ब्रिन यांनी ७ सप्टेंबर १९९८ साली गुगल कंपनीची स्थापना केली. लॅरी पेज व सर्जेई ब्रिन यांनी सुरवातीला या कंपनीचे नाव बॅकरब असे ठेवले होते. मात्र नंतर ते बदलून गुगल असे ठेवण्यात आले. त्याचे कारणही रंजक आहे. गुगल ही एक गणिती संज्ञा आहे. एकावर १०० शुन्ये दिल्यावर जो आकडा येतो त्याला गुगल म्हटले जाते. मिल्टन सिरोट्टा या गणित तज्ज्ञाने ही संज्ञा शोधून काढली व वापरली. जगातील प्रचंड माहितीच्या साठ्याचे व्यवस्थापन करणे व जगातील कोणालाही ही माहिती सहजगत्या उपलब्ध करून देणे हा हेतू असल्याने कंपनीचे नाव गुगल असे ठेवण्यात आले. गुगल कंपनीची स्थापना ७ सप्टेंबरला झाली असली तरी २००५ पासून कंपनीने २७ सप्टेंबर हा दिवस वाढदिवसासाठी जाहीर केला. या पाठीमागचे कारण म्हणजे २७ सप्टेंबर रोजी गुगलला सर्वात अधिक पेज व्ह्यू मिळाले. २७ सप्टेंबर या दिवशी सर्वात जास्त पेज व्ह्यू मिळाल्याने हाच दिवस गुगलचा वाढदिवस म्हणून साजरा करण्यात यावा असा अट्टाहास गुगलमधील कर्मचाऱ्यांनी धरला. कंपनीने तो मान्य केला तेंव्हापासून म्हणजे २००५ पासून २७ सप्टेंबर याच दिवशी गुगलचा वाढदिवस साजरा केला जातो. ७ सप्टेंबर १९९५ रोजी स्थापन झालेल्या गुगल कंपनीच्या रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. गुगल ही आज जगातील सर्वात मोठ्या कंपनीपैकी एक कंपनी आहे. गुगल कंपनी केवळ भूतकाळात रमत नाही तर भविष्याचा वेध घेऊन नवीन नवीन फीचर्स आपल्या ग्राहकांना देते. गुगलने त्यांच्या मुख्य शोध यंत्रात अनेकदा सुधारणा केली असून, इतर अनेक उपकरणांवर त्याचा वापर कसा वाढवता येईल याचा विचार केला आहे. १९९८ साली गुगलने तंत्रज्ञानाचे जग नाट्यमयरित्या बदलून टाकले व सर्च इंजिन कायमचे सुधारून टाकले. गुगलने जग बदलून टाकले. गुगलने इंटरनेट विश्वात क्रांती केली. आज गुगल हे नाव माहीत नसणारा व्यक्ती शोधूनही सापडणार नाही. गुगलमुळे इंटरनेटची विक्रमी वाढ झाली. जगातील अब्जावधी लोक गुगलचा वापर करतात. गुगल हे जगातील सर्वाधिक वापरले जाणारे सर्च इंजिन आहे. गुगलवर आपण आपल्याला पडलेल्या कोणत्याही प्रश्नांचे उत्तर शोधू शकतो म्हणूनच आज ज्याच्या त्याच्या तोंडी गुगल गुरू हा शब्द रूढ झाला आहे. जगातील कोणतीही माहिती अथवा प्रश्नाचे उत्तर हवे असल्यास गुगल गुरूला विचारा तो क्षणात ती माहिती किंवा प्रश्नाचे उत्तर तुम्हाला देईल. गुगल गुरूला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांचा जालना जिल्हा दौरा कार्यक्रम

जालना - प्रतिनिधी

मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री तथा सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे हे सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून, त्यांच्या दौऱ्याचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. श्री. राणे हे सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता मोटारीने (समृद्धी महामार्ग) राजेवाडी तलाव, ता. बदनापूर, जि. जालना येथे प्रयाण करतील. दुपारी १२.३० ते १.०० वाजता राजेवाडी तलाव येथे आगमन, तलावाची पाहणी तसेच मच्छीमारांसमवेत चर्चा करतील. दुपारी १.०० वाजता मोटारीने सोमठाणा तलाव, ता. बदनापूर, जि. जालना येथे प्रयाण करतील. दुपारी १.१५ ते १.४५ वाजता सोमठाणा तलाव येथे आगमन, तलावाची पाहणी तसेच मच्छीमारांसमवेत चर्चा करतील. दुपारी १.४५ वाजता मोटारीने आमदार नारायण कुचे यांच्या संपर्क कार्यालयाकडे, कृषी महाविद्यालयासमोर, बदनापूर, जि. जालना येथे प्रयाण करतील. दुपारी २.०० ते ३.०० वाजता राखीव.

दुपारी ३.०० वाजता मोटारीने जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील.

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



जालना - प्रतिनिधी

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात प्रभारी तहसीलदार तुषार निकम यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी नायब तहसीलदार विक्रांत मोंढे, सतीश तायडे, पी. डी. शिंदे, सहाय्यक महसूल अधिकारी दीपली राऊत (वानखडे) तसेच संपदा कुलकर्णी, जे. जे. वाघ, एस. एस. भोकरे, वृषाली नवले, रिना नगरकर, रवींद्र हेलकट, देशपांडे व अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

शौर्य दिन कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन

जालना - प्रतिनिधी

शौर्य दिनानिमित्त मंगळवार, दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, जालना येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील वीर पत्नी, वीर माता, वीर पिता, माजी सैनिक, विधवा, त्यांचे अवलंबित व नागरिकांनी कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे. भारतीय सैन्यदलाने २९ सप्टेंबर रोजी पाकिस्तानच्या हद्दीत प्रवेश करून केलेल्या कारवाईत अतिरेक्यांचा खात्मा केला.

भारतीय सैन्यदलाची ही शौर्यपूर्ण कामगिरी जनतेपर्यंत पोहोचविणे व माजी सैनिकांचा यथोचित सन्मान करणे, या उद्देशाने राज्य शासनाने २९ सप्टेंबर हा दिवस शौर्य दिन म्हणून साजरा करण्याचे निश्चित केले आहे.

गुंठेवारी नियमितीकरण प्रस्ताव दाखल करण्यास ३० जून २०२७ पर्यंत मुदतवाढ

जालना - प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायत हद्दी वगळून ग्रामीण भागातील ३१ डिसेंबर २०२० पूर्वी गुंठेवारी पद्धतीने झालेला भूखंड विकास नियमित करण्यासाठी प्रस्ताव दाखल करण्याची मुदत ३० जून २०२७ पर्यंत वाढविण्यात आली आहे. नागरिकांनी या मुदतीत गुंठेवारी नियमितीकरणासाठी प्रस्ताव दाखल करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे. महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियमांतर्गत ३१ डिसेंबर २०२० पूर्वीचे अनधिकृत भूखंड व अनधिकृत भूखंडावरील बांधकाम नियमाधीन करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. यासाठी जालना जिल्ह्यातील महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायत हद्दी वगळता उर्वरित ग्रामीण भागातील ३१ डिसेंबर २०२० पूर्वी गुंठेवारी पद्धतीने झालेला भूखंड विकास नियमित करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील गुंठेवारी कक्षात प्रस्ताव दाखल करण्याची मुदत यापूर्वी ३० जून २०२६ पर्यंत होती. आता ही मुदत ३० जून २०२७ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

निर्धारित मुदतीत प्रस्ताव दाखल न केल्यास किंवा गुंठेवारी नियमितीकरण प्रमाणपत्र न घेता अनधिकृत भूखंडाची खरेदी-विक्री केल्यास तसेच संबंधित जागेवर अनधिकृत बांधकाम केल्यास ते अतिक्रमण समजण्यात येईल.

अशा अनधिकृत व विनापरवाना बांधकामांविरुद्ध महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियमातील कलम ७(१) मधील तरतुदींनुसार बांधकाम पाडण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यामुळे संबंधित नागरिकांनी मुदतीत प्रस्ताव दाखल करून गुंठेवारी नियमितीकरणाची कार्यवाही पूर्ण करून घ्यावी, असे आवाहनही श्रीमती मित्तल यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या पुढाकारातून उपक्रम; इंडिगोच्या सीएसआर कार्यक्रमातून मार्गदर्शन

जालना । प्रतिनिधी - आकाशात झेप घेण्याचे स्वप्न पाहणाऱ्या जालन्यातील मुलींना व्यावसायिक वैमानिक (कमर्शियल पायलट) होण्याची दिशा मिळाली. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या 'गिव्हिंग विंग्ज टू फ्लाय' या विशेष कार्यशाळेला जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांमधील २५० हून अधिक विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

इंडिगोच्या सीएसआर उपक्रमांतर्गत भारत केअर्सच्या माध्यमातून हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन सभागृहात झालेल्या या कार्यशाळेत विमान वाहतूक क्षेत्रातील करिअरच्या संधी, कमर्शियल पायलट होण्यासाठीची पात्रता, प्रशिक्षण आणि निवड प्रक्रियेबाबत विद्यार्थिनींना माहिती देण्यात आली.

कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्ण कांत कनवारिया आणि अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांच्या उपस्थितीत झाले. पारंपरिक करिअरच्या पर्यायांबरोबरच विमान वाहतूक क्षेत्रातील संधींचा विचार करण्याचे आवाहन यावेळी विद्यार्थिनींना करण्यात आले.

भारत केअर्सचे कार्यक्रम समन्वयक कल्पेश मोहोद आणि मास्टर ट्रेनर रुपेश गाडेकर यांनी विद्यार्थिनींना कमर्शियल पायलट होण्यासाठी आवश्यक पात्रता, निवड प्रक्रिया, प्रशिक्षण तसेच भविष्यातील करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींनी पायलट प्रशिक्षण, अभ्यासक्रम, पात्रता आणि विमान वाहतूक क्षेत्रातील करिअरविषयी विविध प्रश्न विचारले. संवादात्मक पद्धतीने झालेल्या या सत्रामुळे विद्यार्थिनींच्या शंकांचे निरसन झाले.

जालन्यातील बारवाले महाविद्यालयाच्या कॅप्टन गार्गी गिरी यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधला.

नुकतेच दक्षिण आफ्रिकेत कमर्शियल पायलट प्रशिक्षण पूर्ण केलेल्या गिरी यांनी पायलट होण्याचा स्वतःचा प्रवास, प्रशिक्षणादरम्यान आलेल्या अडचणी आणि त्यासाठी केलेल्या मेहनतीची माहिती दिली.

कार्यक्रमाच्या नियोजनासाठी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने महत्त्वाची भूमिका होती. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) बाळासाहेब खरात, शिक्षण विस्तार अधिकारी विनया वडजे, समन्वयक सुनील ढाकरके आणि तंत्रस्नेही सोरटी यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले. कलेक्टर थिंक टँक फेलो सुप्रविण पाखरे, मुख्यमंत्री फेलो सिमरन जैस्वाल आणि मुख्यमंत्री फेलो तनया सावंत यांनीही आयोजन व समन्वयासाठी सहकार्य केले.

कार्यशाळेला मिळालेला प्रतिसाद लक्षात घेता 'गिव्हिंग विंग्ज टू फ्लाय'च्या दुसऱ्या बॅचसाठी ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत नोंदणी सुरू आहे. पात्र विद्यार्थिनींनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जालना जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.





जिल्ह्यातील नियोजित "पंडित दीनदयाळ उपाध्याय विश्वविक्रमी रोजगार महाकुंभ" स्थगित

जालना - महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या मार्गदर्शनाखाली जालना जिल्ह्यात २९ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेला 'पंडित दीनदयाळ उपाध्याय विश्वविक्रमी रोजगार महाकुंभ' स्थगित करण्यात आला आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जालना तसेच मॉडेल करिअर सेंटर, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने विविध ठिकाणी या रोजगार महाकुंभाचे आयोजन करण्यात येणार होते. मात्र, छत्रपती संभाजीनगर विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक २०२६ ची आदर्श आचारसंहिता लागू झाल्यामुळे हा कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला आहे. रोजगार महाकुंभाची नवीन तारीख आणि कार्यक्रमाचे वेळापत्रक योग्य वेळी प्रसिद्धी माध्यमांद्वारे जाहीर करण्यात येईल, अशी माहिती जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्तांनी दिली. दरम्यान, रोजगाराच्या शोधात असलेले युवक-युवती, नोकरी इच्छुक उमेदवार, नियोक्ते, औद्योगिक आस्थापना तसेच संबंधित घटकांनी या बदलाची नोंद घ्यावी, असे आवाहन केले आहे.

ज्ञानदेव जाधव यांचे निधन

जालना । प्रतिनिधी - दैनिक दुनियादारीचे अकाउंटंट ज्ञानदेव बाबासाहेब जाधव (वय ६२ वर्ष) यांचे आज रविवारी दि. २७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी आणि एक मुलगा असा परिवार आहे. ते ह. भ. प. प्रशांत महाराज जाधव यांचे वडील होते. त्यांच्या पार्थिवावर आज रात्री १०.३० वाजता रामतीर्थ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.



विमुक्त जाती, भटक्या जमातींच्या नागरिकांसाठी विशेष अभियान

'भटके-विमुक्त हक्क व प्रमाणपत्र अभियान'चा लाभ घेण्याचे सहायक संचालक अनंत कदम यांचे आवाहन

जालना । प्रतिनिधी - विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या नागरिकांना आवश्यक ओळखपत्रे व विविध प्रमाणपत्रे सुलभतेने उपलब्ध करून देण्यासह शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी 'राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता' अभियानांतर्गत २७, २८ आणि २९ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्ह्यात विशेष 'भटके-विमुक्त हक्क व प्रमाणपत्र अभियान' राबविण्यात येणार आहे. पात्र नागरिकांनी या विशेष अभियानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक अनंत कदम यांनी केले आहे.

या अभियानासाठी महसूल विभाग, योजनांशी संबंधित विविध शासकीय विभाग तसेच इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मंडळ व तालुकास्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. विमुक्त जाती व भटक्या जमातींची भटकंतीची जीवनशैली लक्षात घेऊन शासनाच्या विविध योजना आणि मूलभूत हक्कांशी संबंधित कागदपत्रे त्यांच्यापर्यंत प्रभावीपणे पोहोचविणे हा अभियानाचा उद्देश आहे.

अभियानात आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, शिधापत्रिका, जात प्रमाणपत्र, आयुष्मान भारत कार्ड, उत्पन्नाचा दाखला, नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र, रहिवासी अथवा अधिवास दाखला, विवाह नोंदणी तसेच दिव्यांग प्रमाणपत्र यासारखी आवश्यक कागदपत्रे पात्र लाभार्थ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी कार्यवाही करण्यात येणार आहे.

यासोबतच श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजना, संजय गांधी निराधार अनुदान योजना, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, प्रधानमंत्री आवास योजना आणि प्रधानमंत्री किसान सन्मान निधी यासह विविध शासकीय योजनांचा पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी संबंधित विभागांची यंत्रणा शिबिरांमध्ये उपस्थित राहणार आहे.

तालुकानिहाय शिबिरांचे वेळापत्रक

जालना तालुका : २७ सप्टेंबर रोजी शिकलगीर वस्ती, रामनगर, जालना येथे, तर २८ सप्टेंबर रोजी वडार वस्ती, शिवनगर, जालना येथे शिबिर होणार आहे.

बदनापूर तालुका : २७ सप्टेंबर रोजी बंजारा वस्ती, आन्वी येथे, २८ सप्टेंबर रोजी बंजारा वस्ती, धामणगाव येथे, तर २९ सप्टेंबर रोजी बंजारा वस्ती, वसंतनगर येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

अंबड तालुका : २७ सप्टेंबर रोजी नाथगोसावी वस्ती व बाबर वस्ती, अंबड येथे, तर २८ सप्टेंबर रोजी लोहार वस्ती व बंजारा वस्ती, शाहपूर येथे शिबिर होणार आहे.

घनसावंगी तालुका : २७ सप्टेंबर रोजी भिल्लवस्ती, पारधी वस्ती, घनसावंगी शहर, कैकाडी वस्ती मांदळा रोड, घनसावंगी, कैकाडी वस्ती भावनगर, घनसावंगी शहर या परिसरातील संबंधित भटके-विमुक्त वस्त्यांमध्ये, २८ सप्टेंबर रोजी कैकाडी वस्ती, पारडगांव येथे, तर २९ सप्टेंबर रोजी कैकाडी वस्ती, रांजणी तसेच धनगर वस्ती, रांजणी येथे शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

मंठा तालुका : २७ सप्टेंबर रोजी कैकाडी वस्ती, मंठा येथे, २८ सप्टेंबर रोजी बंजारा वस्ती, मंठा येथे, तर २९ सप्टेंबर रोजी धनगर वस्ती, तळणी येथे शिबिर होणार आहे.

परतूर तालुका : २७ सप्टेंबर रोजी वडार वस्ती येथे, २८ सप्टेंबर रोजी शिकलकरी वस्ती, परतूर येथे, तर २९ सप्टेंबर रोजी बंजारा वस्ती, आष्टी येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

भोकरदन तालुका : २७ सप्टेंबर रोजी नाथगोसावी वस्ती, भोकरदन, गोसावी समाज वस्ती फत्तेपूर (शिबीर नाथगोसावी येथे) भोकरदन परिसरात, २८ सप्टेंबर रोजी पारधी वस्ती व लबानवस्ती- राजुर, परिसरात तर २९ सप्टेंबर रोजी तसेच बंजारा/ वस्ती, तपोवन, गोसावी वस्ती - मोतीनगर तपोवन परिसर येथे शिबिर होणार आहे.

जाफ्राबाद तालुका : २७ सप्टेंबर रोजी वडार वस्ती, गोंधळी वस्ती व धनगर वस्ती, खासगांव येथे, २८ सप्टेंबर रोजी गोसावी वस्ती, माहोरा येथे, तर २९ सप्टेंबर रोजी वडार वस्ती, जाफ्राबाद तसेच भोई वस्ती, जाफ्राबाद येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

शिबिरापूर्वी वस्तीस्तरावर पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून घेण्यात येणार आहे. अभियानादरम्यान पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे तात्काळ वाटप करण्यावर भर देण्यात येणार आहे. संबंधित उपविभागीय अधिकारी, गटविकास अधिकारी, तहसीलदार, मुख्याधिकारी, आरोग्य विभागाचे अधिकारी तसेच जिल्हा व तालुकास्तरावरील विविध विभागांचे सक्षम अधिकारी शिबिरांना उपस्थित राहणार आहेत.

जिल्ह्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या पात्र नागरिकांनी संबंधित शिबिरांच्या ठिकाणी उपस्थित राहून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करावी आणि उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या विविध शासकीय सेवा व योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक अनंत कदम यांनी केले आहे.

मराठवाडा संघटन आढावा दौरा

जालना जिल्ह्यात शिवसेना पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक संपन्न

जालना । प्रतिनिधी - शिवसेना मुख्यनेते तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा. श्री. एकनाथराव शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार आणि शिवसेना संसदीय गटनेते खासदार डॉ. श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या सूचनेनुसार राज्यभरात ''मराठवाडा संघटन आढावा दौरा'' सुरू आहे. या दौऱ्यांतर्गत आज जालना येथे शिवसेना सचिव भाऊसाहेबजी चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली.

या बैठकीत जालना, बदनापूर, भोकरदन, परतूर आणि घनसावंगी या पाचही विधानसभा मतदारसंघांतील संघटनेच्या कामाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या प्रसंगी पक्षातील प्रलंबित प्रश्न, प्रलंबित संघटनात्मक नेमणुका, पदाधिकाऱ्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन तसेच संघटन वाढवताना येणाऱ्या विविध अडचणींवर सविस्तर चर्चा झाली. आगामी काळात शिवसेना पक्षाचा जिल्ह्यात अधिक मजबुतीने विस्तार करण्यासाठी आवश्यक असलेल्या नियोजनाची रूपरेषा या वेळी ठरवण्यात आली.

''संघटना मजबूत करण्यासाठी प्रत्येक पदाधिकारी आणि कार्यकर्त्याशी थेट संवाद, सातत्यपूर्ण आढावा आणि प्रभावी नियोजन हाच शिवसेना संघटनबांधणीचा मुख्य संकल्प आहे,'' असे प्रतिपादन या वेळी नेत्यांनी केले.

प्रमुख नेत्यांची व पदाधिकाऱ्यांची उपस्थिती

या बैठकीस शिवसेना उपनेते तथा माजी मंत्री आमदार अर्जुनराव खोतकर, संपर्कप्रमुख भास्कररराव अंबेकर, पंडितराव भुतेकर, युवासेना सचिव अभिमन्यू खोतकर, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, जिल्हाप्रमुख ए. जे. पाटील बोराडे, जिल्हासंघटक ॲड. भास्कर मगरे, शिवसेना शहर प्रमुख विष्णु पाचफुले महिला जिल्हासंघटक कालिंदाताई ढगे आणि युवती सेना जिल्हासंघटक रोहिणी पिंपळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच उपजिल्हाप्रमुख भूषण शर्मा, प्रवीण फुके पाटील, संतोष मोहिते, रावसाहेब पवार; युवा जिल्हा समन्वयक संतोष जेधे पाटील; युवासेना जिल्हाप्रमुख अमोल ठाकूर, अजय कदम; युवासेना लोकसभा प्रमुख गणेश मोहिते; तालुकाप्रमुख कल्याणराव अवघड, भगवान अंभोरे, नानासाहेब वानखेडे, दत्तात्रय बंगाळे, उदयकुमार बोराडे, अमोल सुरुंग, बापूसाहेब आर्दड, शिवाजी जऱ्हाड, विशाल गाडे; महिला तालुका संघटक छायाताई जऱ्हाड, शोभाताई वाघराळ; महिला शहरप्रमुख उज्ज्वलाताई पोखरिया; जि. प. सदस्य कैलास चव्हाण, सुधाकर वाढेकर, बबनराव खरात; युवासेना तालुकाप्रमुख नागेश डवले, ईश्वर जुंबड, बालाजी पवार, गणेश पुंगळे; मनपा विरोधी पक्षनेते कमलेश खरे; गटनेते दीपक राठोड; नगरसेवक दुर्गेश कठोटीवाले, अश्विन अंबेकर, किशोर पांगारकर, डुकरे पाटील; शहर संघटक योगेश रत्नपारखे, घनश्याम खाकीवाले, जफरखान पठाण, शेख नजीर; माजी शहरप्रमुख बाला परदेशी; उपतालुकाप्रमुख महादू गीते, रतनकुमार नाईक, सागर पाटील, अंबादास कोळसकर, सखाराम लेके, कडूबा इंदलकर, रामकिसन कायंदे, अमोल दाभाडे, देवा ढाकणे, राहुल निगवेकर, सर्जेराव वाघ, बाळू पाचरणे आणि प्रकाशराव खरात यांच्यासह शिवसेना, युवासेना, महिला आघाडी, दलित आघाडी, कामगार सेना, किसान सेना, अल्पसंख्याक सेना व शिवउद्योग सहकार सेनेचे सर्व प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



हे पत्र मालक, प्रकाशक अनिल शिवाजी खरगे. मुद्रक आनंद काशीनाथ इंगळे यांनी महामाया प्रिंटींग प्रेस, श्रीराम अपार्टमेंट, गनेदिवाल लेआऊट, भाग्यनगर अमरावती ४४४६०२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय साप्ताहिक **आर्य व्रत**, वारंटवार रोड, मोदीखाना, जालना, पो जालना ता जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : अनिल शिवाजी खरगे मो.नं. ९९६०००७९८२**, RNI No. MHMAR/25/0711
Owner & Publisher Anil Shivaji Kharge, Printer, Ananad Kashinath Ingle Printed At Mahamaya Printing Press, Shriram Apartment, Ganediwal Layout Bhagya Nagar, Amaravati, 444602 Maharashtra. Place of Publication Office Weekly AARYA WRAT, War and Want Road, Modikhana, JALNA, Tq. Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Anil Shivaji Kharge, Mob no. 9960007982
अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल. (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत)